
# ‘लोक माझे सांगाती’मधून उद्धव ठाकरेंबद्दल नाराजी



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांच्या ‘लोक माझे सांगाती’ या आत्मचरित्राच्या दुसऱ्या भागाच्या आवृत्तीचे प्रकाशन मंगळवारी (दि. २) झाले. या नव्या आवृत्तीमध्ये अनेक धक्कादायक खुलासे करण्यात आले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांचे मंत्रालयात फक्त दोनदा जाणे हे पचनी पडणारे नव्हते, अशी नाराजी खासदार शरद पवार यांनी या पुस्तकातून व्यक्त केली आहे. बाळासाहेबांसमवेतची संवादातली सहजता उद्धवशी बोलताना नव्हती, अशी टिपण्णीदेखील त्यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून केली आहे. स्वपक्षातील असंतोषाचा उद्रेक शमवायला शिवसेना नेतृत्व कमी पडले तसेच महाविकास आघाडी सरकार कोसळण्यापूर्वी निर्माण झालेल्या पेचप्रसंगात उद्धव ठाकरे यांनी पहिल्याच टप्प्यात माघार घेतली, असेही खासदार पवारांनी पुस्तकात नमूद केले आहे.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १५ ◆ अंक २८४

www.ramprahar.com

# रामप्रहर

बुधवार, ३ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग


राज्यातील १० सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या/२

खोपोलीत पाणीगळतीकडे पालिकेचे दुर्लक्ष/५

रासळ संघ आमदार चषकाचा मानकरी/८


# खासदार शरद पवार निवृत्त

## राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद सोडण्याची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेण्याची घोषणा मंगळवारी (दि. २) केली. याचबरोबर पक्षाचे अध्यक्षपद सोडण्याचे जाहीर करून टाकले. ’लोक माझे सांगाती’ या त्यांच्या आत्मचरित्राच्या दुसऱ्या भागाच्या प्रकाशन सोहळ्यात त्यांनी अचानक असा पवित्रा घेतल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.**



मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये झालेल्या कार्यक्रमात खासदार शरद पवार म्हणाले की, १९९९मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली, तेव्हापासून गेली २४ वर्षे पक्षाचा अध्यक्ष म्हणून काम पाहत आहे. सार्वजनिक जीवनातील १ मे १९६०पासून सुरू झालेला हा संपूर्ण प्रवास गेली ६३ वर्षे अविरत चालू आहे. त्यापैकी ५६ वर्षे मी कुठल्या ना कुठल्या सभागृहाचा सदस्य किंवा मंत्री म्हणून सातत्याने काम करीत आहे. संसदेतील राज्यसभा सदस्यपदाची पुढील तीन वर्षे शिल्लक आहेत. या काळात राज्याच्या आणि देशाच्या प्रश्नांमध्ये अधिकाधिक लक्ष घालण्यावर माझा भर असेल. याशिवाय मी कोणतीही अन्य जबाबदारी घेणार नाही. सार्वजनिक जीवनातील १ मे १९६० ते १ मे २०२३ इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर आता कोठेतरी थांबण्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि शिक्षण, शेती, सहकार, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात अधिक काम करण्याचा माझा मानस आहे तसेच युवक, युवती व विद्यार्थी यांच्या संघटनांकडे आणि कामगार, दलित, आदिवासी व समाजातील इतर कमकुवत घटकांच्या प्रश्नांकडे माझे लक्ष राहिल.

मी पक्षाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होत असलो तरी माझी सार्वजनिक कार्यातून निवृत्ती नाही. मी साठ दशकांहून अधिक काळ जनमानसांत काम करीत आलो आहे. त्या सेवेत कुठलाही खंड पडणार नाही. उलट सार्वजनिक कार्यात मला अधिक वेळ देता येईल, असेही खासदार पवार यांनी या वेळी म्हटले.

## साहेब फेरविचार करणार –अजित पवार

खासदार शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होत असल्याची घोषणा केल्यानंतर भावूक कार्यकर्त्यांनी धरणे, उपोषण चालू केले. त्यानंतर राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी पवारसाहेब निर्णयाबाबत फेरविचार करणार असल्याचे म्हटले आहे. आम्ही नेत्यांनी मिळून साहेबांशी चर्चा केली आहे. त्यावर तुमच्या आग्रहाखातर मला विचार करायला दोन ते तीन दिवस द्या.’ असा निरोप त्यांनी धाडला असल्याचे अजित पवार म्हणाले. दरम्यान, खासदार शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानाबाहेर सुरक्षा वाढविण्यात आली आहे.

# ‘रयत’च्या पनवेल येथील महात्मा फुले आणि मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाला नॅकचा ए+ दर्जा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि मोखाडा (जि. पालघर) येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाला नॅकचा ए+ दर्जा मिळाला आहे. याबद्दल दोन्ही महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापकवर्गाने महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन व संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मंगळवारी (दि. २) अभिनंदन केले.

कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची कवाडे सर्वसामान्यांसाठी खुली केली. यातूनच पनवेल येथे १९७० साली महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय उभे राहिले. अनेक जण या महाविद्यालयात शिकून सध्या मोठ मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. गेल्या वेळी या महाविद्यालयाला नॅकचा ए दर्जा मिळाला होता. या वेळी त्यात सुधारणा होऊन आता ए+ दर्जा प्राप्त झाला आहे.

या यशाबद्दल महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन व ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मंगळवारी भेट घेत त्यांचे अभिनंदन केले. या वेळी उपप्राचार्य आर. ए. पाटील, नॅक समन्वयक प्रा. सोपान गोवे, ग्रंथपाल एस. एस. औचिते उपस्थित होते.

मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयालाही नॅक पुनर्मूल्यांकनात ए+ दर्जा प्राप्त झाला आहे. (पान २ वर..)

## अतिशय आनंद झाला -लोकनेते रामशेठ ठाकूर

मोखाडा या पालघर जिल्ह्यातील पोहचायला अवघड असलेल्या जंगलातील जागेवर रयत शिक्षण संस्थेने १९८४मध्ये महाविद्यालय उभारले. या ग्रामीण भागातील महाविद्यालयाच्या विकास समिती चेअरमनपदाची जबाबदारी संस्थेने माझ्यावर टाकली व जी लागेल ती साथ देऊ, असे सांगितले. इथे प्राचार्यांचेही ऑफिस नव्हते. आम्हाला बसायला जागा नसल्याने झाडाखाली बैठक घेतली व काम सुरू केले. आज माझ्या नावाने या महाविद्यालयाच्या दोन सुंदर इमारती उभ्या राहिल्या आहेत, ज्याचे सर्वजण कौतुक करीत आहेत. मोखाड्यासोबतच पनवेलच्या महात्मा फुले महाविद्यालयालाही नॅकचा ए+ दर्जा मिळाला आहे. येथेही मी महाविद्यालय विकास समितीचा चेअरमन आहे. या दुहेरी शैक्षणिक यशामुळे मला अतिशय आनंद झाला आहे, अशा शब्दांत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भावना या वेळी व्यक्त केल्या.

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने मी प्रभू राम पाहिला. त्यांच्या दातृत्वाने महाविद्यालयाची नवी भव्य इमारत उभी राहिली असून हे यश मिळाले आहे.**
**–एल. डी. भोर, प्राचार्य**
**लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय, मोखाडा**

**चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, पिल्लई कॉलेज व महात्मा फुले महाविद्यालय अशी पनवेल परिसरातील तीन महाविद्यालये आता नॅक दर्जाप्राप्त बनली आहेत. त्यामुळे पनवेल हे विद्येचे माहेरघर बनण्याच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे. पनवेलमध्ये अधिकाधिक शैक्षणिक संधी निर्माण होत असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.**
**–परेश ठाकूर, अध्यक्ष, माजी विद्यार्थी मंडळ,**
**महात्मा फुले महाविद्यालय, पनवेल**

**बहुजनांच्या शिक्षणासाठी उभे राहिलेल्या पनवेलच्या महात्मा फुले महाविद्यालयाला नॅकचा ए+ दर्जा प्राप्त झाला आहे हे खूप चांगले झाले. यात व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी मंडळ यांनीही सहभाग घेतला होता. आता हे ऑटोनॉमस कॉलेज झाले पाहिजे.**
**–महेंद्र घरत, माजी अध्यक्ष,**
**माजी विद्यार्थी मंडळ, महात्मा फुले**
**महाविद्यालय, पनवेल**

**विद्यार्थी म्हणून पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले. यासाठी संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर व अन्य मान्यवर, सहकारी प्राध्यापक, माजी विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.**
**–डॉ. गणेश ठाकूर, प्राचार्य,**
**महात्मा फुले महाविद्यालय, पनवेल**


# हार्दिक अभिनंदन!



## महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पनवेल

## लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा




ACCREDITED WITH GRADE A+ NAAC







नॅकचा ए+ दर्जा मिळाल्याबद्दल पनवेल आणि मोखाडा महाविद्यालयांच्या विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या टीमचे हार्दिक अभिनंदन!



मा.श्री. अरुणशेठ भगत
अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था



मा.श्री. वाय. टी. देशमुख
व्हाईस चेअरमन, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था



मा.श्री. आमदार प्रशांत ठाकूर
संचालक, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था



मा.श्री. परेश ठाकूर
संचालक, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था

# लोकअदालतीत १६ हजार ३३९ प्रकरणे निकाली

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्याचा जलद निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत, या हेतूने रायगड जिल्ह्यात रविवारी (दि. ३०) लोकअदालत आयोजित करण्यात आली होती. या लोकन्यायालयात एकूण १६ हजार ३३९ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयांत वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एन. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील वादपूर्व प्रकरणे व प्रलंबित अशी एकूण ८९ हजार ११९ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी वादपूर्व प्रकरणे १४ हजार ८७५ व प्रलंबित प्रकरणांपैकी एक हजार ४६४ प्रकरणे अशी एकूण १६ हजार ३३९ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली व त्याद्वारे पक्षकारांना एकूण १३ कोटी ३८ लाख ७२ हजार १५६ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.



**रायगडात १३ कोटी ३८ लाख ७२ हजारांची वसुली**

रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत २९ लोकअदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोकअदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडिओ कॉलचा वापर करूनसुद्धा प्रकरणे मिटविण्यात आली.

या लोक न्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड, पोलीस अधीक्षक रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एस. सावंत व न्यायाधीश तथा सचिव अमोल शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

### नऊ जोडप्यांचा संसारही जुळला

*रायगड जिल्ह्यातील लोकन्यायालयात नऊ जोडप्यांचा (अलिबाग, श्रीवर्धन, पेण, रोहा पनवेल येथील लोकन्यायालयात प्रत्येकी एक, तर माणगाव व महाड येथे दोन) सामंजस्याने वाद मिटल्यामुळे संसार सुरळीत झाला आहे. अलिबाग येथील पक्षकारांचा प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस. एस. सावंत व पॅनलवरील सर्व न्यायाधीशांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.*

# राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मंगळवारी (दि. २) दहा सनदी अधिकाऱ्यांची बदली केली आहे. यामध्ये जी. श्रीकांत हे छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे नवे आयुक्त असणार आहे, तर पी. शिवशंकर हे शिर्डी संस्थानचे नवे सीईओ असतील. राज्यात आपल्या कार्यशैलीने सर्वाधिक चर्चेत असलेले तुकाराम मुंडे यांना कृषी आणि पशूसंवर्धन खात्याचे अतिरिक्त सचिव म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली.

डॉ. नितीन करीर हे सध्या अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून महसूल, नोंदणी आणि मुद्रांक, महसूल आणि वन विभागाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांना अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. मिलिंद म्हैसकर यांची सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डी. टी. वाघमारे यांची गृहविभागाच्या पीएस म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. राधिका रस्तोगी यांची अल्पसंख्याक विकास विभागाच्या प्रधान सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. संजीव कुमार यांची महापारेषण विभागाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून आयएएस अधिकारी श्रावण हर्डीकर यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे आयुक्त असलेले डॉ. अभिजित चौधरी यांची राज्य कर विभागात छत्रपती संभाजीनगरचे सहआयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# माणगावात मान्सूनपूर्व गटार सफाईच्या कामाला वेग

**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा जवळ आल्याने माणगाव नगरपंचायतीने मान्सूनपूर्व कामाला गती दिली असून गटारे साफ करण्याच्या कामाला वेग आला आहे.

त्याप्रमाणे पावसाळ्यात धोकादायक इमारती कोसळण्याचा धोका लक्षात घेता ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या पक्के धोकादायक इमारतीची पाहणी करून धोका संभावणाऱ्या इमारतीच्या मालकांना नोटीस देवून आवश्यकतेनुसार कारवाई करण्याची सूचना दिल्या जाणार आहेत. मालकीचे असणारे धोकादायक वृक्ष तोडण्यासाठी संबंधित मालकांना सूचना तसेच सार्वजनिक धोकादायक वृक्ष तोडणे, जीर्ण वृक्ष तोडण्याची कामे हाती घेतली जाणार आहेत. जेणेकरून पावसाळ्यात कोणतीही नैसर्गिक आपत्ती ओढावू नये म्हणून उपयोजना नगरपंचायतीकडून आखण्यात येत आहे.

बसस्थानक, निजामपूर मार्गावरील रेल्वे पुलाखाली तसेच कचेरी मार्गावर, बामणोली मार्गावर, मोर्बा मार्गावर, उपजिल्हा रुग्णालयासमोर पाणी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात तुंबते त्यामुळे महिला, वृद्ध, लहान मुले व प्रवासी नागरिकांना नाहक याचा त्रास सहन करावा लागतो. माणगाव शहरातील अनेक ठिकाणी बंद असणारी गटारे तर काही ठिकाणी उघडी असणारी गटारात प्लास्टिक बाटल्या, प्लास्टिक, कचरा व गाळ मोठ्या प्रमाणात साठला असून ही गटारे ठिकठिकाणी तुंबली आहेत. ही गटारे साफ करण्याचे काम नगरपंचायतीने हाती घेतले आहे.



# शिवसेना कामगार सेनेच्या प्रमुखपदी प्रदीप वाघमारे

**नवी मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या कामगार सेनाप्रमुख नवी मुंबईपदी प्रदीप वाघमारे यांनी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा असल्याचे सांगण्यात आले. या वेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण यांना सक्रियपणे प्रचार आणि प्रसार करीत शिवसेना पक्षवाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य करणार असल्याचा विश्वास या वेळी शिवसेना कामगार सेनेचे नवी मुंबई प्रमुख प्रदीप वाघमारे यांनी व्यक्त केला.

# प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन, स्वतंत्र रुग्णालय उभारणार –कामगारमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्ताने पिंपरी चिंचवडमध्ये राज्यस्तरीय कामगारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी कामगार मंत्री सुरेश खाडे उपस्थित होते. या वेळी त्यांनी, प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन, कामगारांसाठी स्वतंत्र रुग्णालय, प्रत्येक तालुक्यात सेतू केंद्र, चौकाचौकात कामगार नाका शेडची उभारणी करण्यार असल्याचे जाहीर केले, तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणाही या कार्यक्रमात करण्यात आली. या वेळी पत्रकारांनी कामगार भरती प्रक्रियेबाबत, बरसू रिफायनरी प्रकल्प, फॉक्सकॉन प्रकल्प याअनुषंगाने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरेही त्यांनी दिली.



कार्यक्रमात बोलताना राज्याच्या अर्थव्यवस्थेत कामगार महत्त्वाचा घटक असून कामगारांच्या कल्याणाला राज्य शासनाचे प्राधान्य आहे. राज्यातील सर्व कामगारांना योजनांचा लाभ मिळावा म्हणून प्रत्येक तालुक्यामध्ये सर्व प्रकारच्या कामगार नोंदणीसाठी कामगार सेतू नोंदणी केंद्र, नाक्यावरील कामगारांकरीता कामगार निवारा उभारणार असल्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी सांगितले आहे.

# विद्याभवनमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व्हावे –प्रकाश इंदलकर

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव प्रकाश इंदलकर यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. त्या वेळी बोलताना इंदलकर यांनी, विद्याभवन या नामांकित संकुलात आता स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

विद्याभवनचा इ. दहावी व बारावी परीक्षांचे निकाल गेल्या अनेक वर्षांपासून सर्वोत्तम लागत असून हे नवी मुंबईतील एक नामांकित संकुल बनले आहे. विद्याभवन संकुलाच्या परिसरात विद्यार्थ्यांसाठी मल्टीपर्पस टर्फचे उद्घाटन इंदलकर यांच्या हस्ते करण्यात आले. संकुलातील विद्यार्थ्यांना फुटबॉल, क्रिकेट, बास्केटबॉल, बॅडमिंटन या प्रकारचे खेळ या ठिकाणी खेळता येणार आहेत. इंदलकर यांनी सर्व उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात संकुलतील शिक्षकांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.




या कार्यक्रमास पुणे विद्यार्थीगृहाचे संचालक दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक भिमराव आडसूळ, राजकुमारी इंदलकर, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# नवी मुंबई पालिकेत लोकशाही दिन

**नवी मुंबई** : नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

जून महिन्याचा लोकशाही दिन महिन्याच्या पहिल्या सोमवारी ५ जून रोजी होणार असून निवेदनकर्त्यांनी आपला अर्ज विहित नमुन्यात दोन प्रतींमध्ये १९ मेपर्यंत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे लोकशाही दिनाकरीता अर्ज असे अर्जाच्या वरील दर्शनी भागी ठळकपणे नमूद करून सादर करावयाचा आहे.

अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयावर असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत याआधी विभाग कार्यालय, विभाग प्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. थेट लोकशाही दिनात अर्ज सादर करण्यात येऊ नये. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपिल, सेवाविषयक–आस्थापना विषयक बाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत. लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नागरिकांसाठी महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से. १५ ए, किल्ले गांवठाणजवळ, सीबीडी., बेलापूर येथे विनामूल्य उपलब्ध असून नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in यावरील डाऊनलोड आयकॉनवरून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करून घेता येऊ शकते.

# राज्यात ६ मेपासून छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिर

**मुंबई : प्रतिनिधी**

कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील ३६ जिल्ह्यांत ६ मे ते ६ जून या कालावधीत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी विविध संधींची माहिती या शिबिरांमधून दिली जाणार आहे. यामध्ये समुपदेशन केले जाणार आहे, अशी माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

राज्यातील विद्यार्थी व पालकांनी या शिबिरांमध्ये सहभागी व्हावे व बदलत्या काळास अनुसुरुन विविध शैक्षणिक, व्यावसायिक इत्यादी अभ्यासक्रमांची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन मंत्री लोढा यांनी केले.

इयत्ता दहावीनंतर करिअर कसे निवडावे, दहावी नंतरच्या शिक्षणाच्या विविध संधी, बारावी नंतरच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा, व्यक्तिमत्व विकास यासोबतच इतर विविध विषयांबाबत मार्गदर्शन देण्यात येणार आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी स्थानिक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी (आयटीआय) संपर्क साधावा, तसेच सोबत जोडलेल्या क्यूआर कोडच्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करून शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

**महावितरण** — **निविदा सुचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत अलिबाग.१, अलिबाग.२ व पेण उपविभागात असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या आणि वितरण रोहित्रे यांच्या प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांकरिता ई.निविदा क्रमांक **टी.०१, टी.०२, टी.०३/२०२३.२४** एकूण ३ निविदा अंदाज पत्रकीय रक्कम प्रत्येकी १०.०० लाख महावितरण कंपनीच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी **दि. ०३.०५.२०२३ ते ०७.०५.२०२३ (रात्रौ ११.५५ वा.)** पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख **दि. ०८.०५.२०२३ ला रात्री ११.५५** वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**कार्यकारी अभियंता**
**अलिबाग विभाग**

PRO/BNDUZ/No.919 Dt.02/05/2023

**पान १ वरून**

## ‘रयत’च्या पनवेल येथील महात्मा फुले आणि मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाला नॅकचा ए+ दर्जा

याआधी तो बी असा होता. आदिवासीबहूल परिसरात १९८४ साली स्थापन झालेल्या या महाविद्यालयाच्या जुन्या इमारतीचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पूर्ण नूतनीकरण केले. या लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या भव्य व सुसज्ज इमारतीचा लोकार्पण सोहळा अलिकडेच ८ एप्रिल रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. त्यानंतर आता या महाविद्यालयाला नॅकचा ए+ दर्जा मिळाला आहे.

या यशाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य एल. डी. भोर, उपप्राचार्य एस. ई. सैंदनशिव, एस. जी. मेंगाळ, नॅक समन्वयक ए. एन. चांदोरे यांच्यासह विविध विभाग प्रमुख, प्राध्यापक यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन अभिनंदन केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दोन्ही महाविद्यालयांना नॅकचा ए+ दर्जा मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करून प्राचार्य व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले.

# महापारेषणमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात





**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) ६३वा महाराष्ट्रदिन व कामगारदिन उत्साहात साजरा करण्यात आला. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी संचालक (संचलन) संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) नसीर कादरी, संचालक (वित्त) अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता जुईली वाघ, सुनील सूर्यवंशी, भूषण बल्लाळ, पीयूष शर्मा, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) नितीन कांबळे, अभय रोही, उपमुख्य सुरक्षा अधिकारी राजेश गोवळकर, उपमुख्य दक्षता अधिकारी प्रशांत गोरडे, शिष्टाचार अधिकारी सतिश जाधव व कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे यांच्या हस्ते महापारेषणच्या प्रशासकीय परिपत्रकाच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. संचालक दिनेश वाघमारे म्हणाले, अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामांमध्ये या पुस्तकामुळे स्पष्टता येणार आहे. संचालक सुगत गमरे म्हणाले, या पुस्तकामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामांमध्ये सुसुत्रता व सुलभता होईल.

**उरण नगरपरिषद, उरण**
**निविदा सूचना**

जा.क्र. उनप/२१७/२०२३–२४
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : ०२/०५/२०२३

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषदेच्या कार्यालयीन कामकाजा करिता नवीन खरेदी केलेली झेरॉक्स मशीन व सी. एफ. सी. विभागा करिता सर्व्हर रूम साठी इनव्हर्टर खरेदी करणे बाबत | १,२००/– | ५००/– |

**अटी/शर्ती :–**

उरण नगरपरिषदेच्या कार्यालयीन कामकाजा करिता नवीन खरेदी केलेली झेरॉक्स मशीन व सी.एफ सी. विभागा करिता सर्व्हर रुम साठी इनव्हर्टर पुरविणे कामी अनुभवी अथवा नोंदणीकृत ठेकेदार कडून मोहोरबंद निविदा मागविणेत येत आहेत. निविदा दि ३/५/२३ पासून दि. ११/५/२३ पर्यंत साय.४.०० वाजे पर्यंतच्या मुदतीत, मुख्याधिकारी उरण नगरपरिषद यांच्यानावे दाखल करणेचे आहे .

इसारा रक्कमः– कामाची इसारा रक्कम धनाकर्ष / रोखीने नगरपरिषद लेखा विभागात दि ११/५/२०२३ रोजी सांय. ४.०० वाजे पर्यंत भरणेचे आहे. ठेकेदार इसारा रक्कम भरणा करणार नाहीत अशा ठेकेदारांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

कोरे निविदा नमुने:– को–या निविदाचे नमुने नगरपरिषदेच्या लेखा विभागात निविदा शुल्क (न परतीचे)रोखीने भरणा केल्यास १२/५/२३ रोजी सांय. ५.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागा मध्ये उपलब्ध होतील. निविदा नमुने कोणत्याही परिस्थितीत पोस्टाने पाठविले जाणार नाहीत. सदर कामाच्या अटी/शर्ती आणि सविस्तर निविदा सूचना पाणीपुरवठा विभागा मधून उपलब्ध होणार असून इच्छूक ठेकेदारांनी पाणीपुरवठा विभागा प्रमुख यांच्याशी संपर्क साधावा.

**सही/–**
**(राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण**

## संपादकीय

# राष्ट्रवादीत भूकंप

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि शरद पवार हे महाराष्ट्राच्याच नव्हे; तर देशाच्या राजकारणातील एक अद्वैत आहे. वयाच्या ८३व्या वर्षीही पवार यांची पक्षावर किती विलक्षण पकड आहे हेच त्यांच्या निवृत्तीच्या घोषणेनंतर उमटलेल्या नेत्या-कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रियेतून दिसून आले.

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरद पवार हे महाराष्ट्रातील जुने जाणते राजकारणी व्यक्तिमत्त्व. त्यांच्या आजवरच्या सत्ताकारणाच्या काळात महाराष्ट्राने अनेक उलथापालथी पाहिल्या आहेत. देशातील बदलते राजकीय वारे शरद पवार यांनी फार जवळून पाहिले. राजकारणात मतभेद असू शकतात, परंतु मनभेद असण्याचे कारण नाही हा वैचारिक सुसंस्कृतपणा शरद पवार यांच्याकडून शिकण्याजोगा आहे. स्व. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्याशी त्यांचे टोकाचे राजकीय मतभेद होते, किंबहुना दोघांचीही विचारसरणी भिन्न टोकांची होती. दोघेही एकमेकांवर कडाडून आणि शेलकी टीका करत, परंतु राजकीय जोडे बाहेर ठेवून त्यांनी वैयक्तिक स्नेह मात्र जपला. याचप्रमाणे शरद पवार यांचे सर्वच पक्षांमध्ये स्नेहपूर्ण संबंध आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात एकजूट घडवण्यासाठी पवार यांनी उघड प्रयत्न केले व अजूनही हे प्रयत्न थांबलेले नाहीत. तरीही पंतप्रधान मोदी यांच्याशी त्यांचे वैयक्तिक संबंध मधुर आहेत. अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व सध्याच्या राजकारणात दुर्मिळच म्हणायला हवे. मंगळवारी सकाळी त्यांच्या 'लोक माझे सांगाती' या आत्मकथेच्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन मुंबईत पार पडले. त्या वेळी मनोगत व्यक्त करताना भाषणाच्या शेवटाला शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देत असल्याचे जाहीर करून उपस्थितांना जबरदस्त धक्का दिला. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते आणि असंख्य कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. त्यांचे परमप्रिय पवारसाहेब नेमके काय म्हणत आहेत हे सुरुवातीला कोणालाच धड कळले नाही. मग मात्र कार्यकर्त्यांच्या भावनांचा उद्रेक पहायला मिळाला. शरद पवार आणि प्रतिभाताई पवार या दोघांनाही राष्ट्रवादीच्या नेत्या-कार्यकर्त्यांनी अक्षरश: घेराव घातला आणि आताच्या आता निवृत्तीचा निर्णय बदला; अन्यथा आम्ही येथेच उपोषणाला बसू असा पवित्रा घेतला. पवारसाहेबांनी निवृत्ती जाहीर केल्यामुळे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना रडू कोसळले, तर जितेंद्र आव्हाड, धनंजय मुंडे आदी नेत्यांना अश्रू अनावर झाले. शरद पवार यांच्या निवृत्तीच्या घोषणेला त्यांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांचेच फक्त समर्थन दिसले. पवारसाहेबांच्या निर्णयाचा आपण सर्वांनीच आदर केला पाहिजे, पवारसाहेब पक्षाध्यक्ष पदावरून दूर होत असले तरी ते राजकारणातून निवृत्त झालेले नाहीत. पक्षाचा नवा अध्यक्ष त्यांच्याच मार्गदर्शनाखाली शिकेल आणि काम करेल अशी भूमिका अजित पवार यांनी मांडली. बराच काळ हे धरणेनाट्य झाल्यानंतर पवार दाम्पत्य सिल्व्हर ओक येथील निवासस्थानी परतले. कार्यकर्त्यांचे मोहोळ मात्र कार्यक्रमाच्या ठिकाणी ठिय्या देऊन बसले होते. अखेर येत्या दोन-तीन दिवसांत निवृत्तीच्या निर्णयाचा पवारसाहेब फेरविचार करतील असे मोघम आश्वासन कार्यकर्त्यांना सायंकाळी दिले गेले. पुढे काय घडते ते कळेलच. शरद पवार यांच्या निवृत्तीच्या निर्णयाने महाविकास आघाडीतील काही नेते अक्षरश: पोरके होण्याची शक्यता आहे, कारण याच नेत्यांनी शरद पवार यांच्यासोबत जाऊन भाजपबरोबरची युती तोडण्याचा आत्मघात करून घेतला होता. यापुढले राजकारण उत्कंठा वाढवणारे असेल यात शंका नाही.**

# बस स्टँडवर प्रवाशांनीही शिस्त पाळणे गरजेचे

पनवेल एसटी स्थानकावर पाकीटमार व महिलांच्या अंगावरील दागिने पळविण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. त्याला आळा घालण्यासाठी आगार व्यवस्थापक सुजीत डोळस यांनी प्रवाश्यांना बसमध्ये रांगेत प्रवेश देण्याच्या सूचना दिल्या आहेत, पण पेण भागातील प्रवासी त्याला विरोध करून दादागिरी करीत असल्याचे दिसून येत असल्याने त्यांना आगार व्यवस्थापकांनी सहकार्य करण्याची विनंती केली आहे.



**खबरबात**
**नितीन देशमुख**

पनवेल एस.टी. स्थानक हे मध्यवर्ती स्थानक असल्याने येथे कोकण, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील गाड्या येत असतात. याशिवाय या स्थानकांवरून मुंबई, ठाणे, कल्याण व तालुक्यातील गावात जाणाऱ्या गाड्या सुटत असतात.

> **पनवेल स्टँडवर महिला व ज्येष्ठ नागरिकांना गर्दीमुळे गाडीत चढणे शक्य होत नाही. त्यातच गर्दीचा फायदा घेऊन पाकीटमारी व महिलांच्या अंगावरील दागिने पळविण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. महिला व ज्येष्ठ नागरिकांना गर्दीत गाडीत चढता येत नाही अनेक तास बसून राहावे लागते. त्यामुळे गाडीत प्रवाश्यांना रांगेत प्रवेश देण्याचा सूचना दिल्या, पण काही प्रवाशी ते न मानता कर्मचाऱ्यांना दमदाटी करीत आहेत. त्यांनी आम्हाला सहकार्य करावे ही विनंती.**
>
> **-सुजीत डोळस, आगार व्यवस्थापक, पनवेल**

येथे हजारो प्रवाशी दररोज चढ-उतार करीत असतात. सकाळी व सायंकाळी गाड्यांना मोठी गर्दी असते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक व महिलाना गाडीत चढता येत नाही व याचा फायदा पाकीटमार घेतात. त्यामुळे पनवेल आगारात नवीन आलेले आगार व्यवस्थापक सुजीत डोळस व स्टँड इन्चार्ज डी. के. म्हात्रे यांनी गाडीत प्रवेश करण्यासाठी रांगेत प्रवेश देण्याच्या सूचना दिल्या. त्यासाठी ते स्वत: आपल्या अधिकाऱ्यांसह स्टँडवर उभे राहून प्रवाश्यांना विनंती करीत आहेत, पण पेण भागातील अनेक प्रवाशी आम्ही रांगेत उभे राहणार नाही म्हणून दादागिरी करीत आहेत. त्यांनी एसटी कर्मचाऱ्यांना सहकारी करावे, असे आवाहन डोळस यांनी केले आहे

> **पनवेल स्थानकावरील पोलीस चौकी एका बाजूला असल्याने दिसत नाही. त्यामुळे स्थानकाच्या आवारात गुन्हेगार प्रवृत्तीचे अनेक जण बिनधास्त फिरत असतात. गर्दीच्यावेळी ते महिलांच्या गळ्यातील दागिने खेचतात, मोबाईल किंवा पर्स खेचून पळून जातात. पोलीस चौकीजवळ असल्यास त्यांना पोलिसांचा धाक वाटेल यासाठी पोलीस चौकीची जागा बदलणे आवश्यक आहे.**
>
> **-संगीता जाधव, प्रवाशी**

येथील पोलीस चौकी ही बस स्थानकापासून लांब शौचालायच्या बाजूला आहे. या चौकीच्या बाजूला एस.टी.च्या गाड्या उभ्या केलेल्या असतात. त्यामुळे चौकी दिसून येत नाही. अनेक वेळा महिलांच्या गळ्यातील दागिने पळवले जातात. या वेळी पोलिसांची मदत घ्यायची झाल्यास पोलीस चौकी शोधावी लागते. त्यामध्ये अनेकवेळा पोलीस नसतात. बस स्थानकाच्या मध्यवर्ती भागात पोलिस चौकी घेतल्यास मुंबई, कल्याण, कोकणात, घाटावर व स्थानिक भागात जाणाऱ्या गाड्याच्या फलाटावर पोलिसांचे लक्ष राहील. गडबड झाल्यास त्वरित पोलीस तेथे पोहचतील. पोलीस जवळ असल्याने पाकीटमारांनाही त्यांचा धाक राहील. पनवेलचे पोलीस निरीक्षक कादबाने यांनी लक्ष देऊन पोलीस चौकीची जागा बदलावी, अशी मागणी प्रवाशी व एस.टी. कर्मचारी ही करीत आहेत.

# आंतरराष्ट्रीय सूर्य दिन

सूर्य, सूर्यमालेच्या केंद्रस्थानी असलेला तारा, ही एक वस्तू आहे ज्याभोवती पृथ्वी आणि प्रणालीचे इतर घटक फिरतात. १३ लाख ९० हजार किलोमीटरपेक्षा जास्त व्यासासह, किंवा पृथ्वीच्या सुमारे १०९ पट, सूर्य ही आपल्या सौरमालेतील सर्वात मोठी वस्तू आहे. मुख्यतः हायड्रोजन आणि हेलियमयुक्त वायूंचा हा प्रचंड बॉल एक शक्तिशाली ऊर्जा साठा आहे. ३ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय सूर्य दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त जाणून घेऊया सूर्याविषयी...

ऊर्जा प्रदान करण्यासाठी सूर्याच्या गाभ्यामध्ये परमाणु संलयन होते. सूर्याच्या ऊर्जे चा थोडासा भाग पृथ्वीवर पोहोचतो; त्यातील १५% अंतराळात परावर्तित होते, ३०% पाण्याची वाफ तयार करण्यासाठी वापरली जाते आणि उर्वरित ८० टक्के विविध वनस्पती आणि महासागर शोषून घेतात. निरनिराळ्या कक्षेत फिरत असताना, त्याचे शक्तिशाली गुरुत्वाकर्षण पृथ्वी आणि इतर ग्रहांना त्याच्याकडे खेचत राहते.

सूर्य, जो पृथ्वी ग्रहापासून १४९.६ दशलक्ष किलोमीटर दूर आहे, त्याच्या सर्वात जवळ असलेला तारा आहे. आपल्या माहितीत असलेले धूमकेतू आणि लघुग्रह वगळता, सूर्यमालेतील सर्व ग्रह त्यांच्या शक्तिशाली गुरुत्वाकर्षणामुळे वेगवेगळ्या अंतरावर त्याच्याभोवती फिरतात. खगोल किरण हे सूर्याचे वारंवार दर्शन घडवणारे आहे.

सूर्य हा अंदाजे गोलाकार, प्रचंड प्लाझ्मा बॉल आहे. हे मुख्यतः हायड्रोजन (७४.९%) आणि हेलियम (२३.८%) बनलेले आहे, थोड्या प्रमाणात (त्याच्या वस्तुमानाच्या २%) ऑक्सिजन, कार्बन, निऑन आणि लोह यांसारख्या जड घटकांनी बनलेले आहे. सूर्याचे प्राथमिक इंधन हायड्रोजन आहे. तथापि, जेव्हा तारा त्याच्या मुख्य जीवन चक्रातून फिरतो तेव्हा हेलियम राख चा एक थर मागे राहतो कारण ज्वलनामुळे त्याचे हेलियममध्ये रूपांतर होते. त्याच्या फिरकीमुळे, सूर्य हा एक गोलाकार तारा आहे ज्याच्या ध्रुवांवर किरकोळ चपटा आहे. हायड्रोजनला त्याचे वस्तुमान देणारी प्रचंड गुरुत्वाकर्षण शक्ती हा एक अवाढव्य आणि सतत बॉम्ब फ्यूजन अणू असूनही थ्रस्टच्या अंतर्गत स्फोटाला संतुलित करते, ज्यामुळे सतत जीवन चालू राहते. कांद्याप्रमाणेच सूर्याला थरांमध्ये ठेवले जाते.

सूर्याचे तापमान साधारणपणे आपल्या मानकांनुसार अत्यंत उच्च असले तरी, ते ताऱ्याच्या क्षेत्रफळानुसार बदलते. सूर्य सतत इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन उत्सर्जित करतो, ज्यामध्ये आपल्या डोळ्यांना दिसणारा प्रकाश असतो, जो आपल्या जगाला उबदार आणि प्रकाशित करतो आणि आपल्याला माहित असल्याप्रमाणे जीवन सक्षम करतो. या कारणास्तव सूर्य अद्वितीय आहे. प्रकाशसंश्लेषणाशिवाय, असंख्य ट्रॉफिक साखळ्यांना आधार देण्यासाठी वातावरणात ऑक्सिजन किंवा वनस्पती जीवनाची आवश्यक पातळी नसते. प्रकाशसंश्लेषण सूर्यामुळे शक्य होते. दुसरीकडे, त्याची उष्णता स्थिर हवामान राखते, द्रव पाण्याच्या अस्तित्वास परवानगी देते आणि असंख्य हवामान चक्र चालवते. शेवटी, सूर्याच्या गुरुत्वाकर्षणाने पृथ्वीला कक्षेत ठेवले जाते. त्याशिवाय, दिवस आणि रात्र नसते.

एका खगोलशास्त्रीय एककाच्या अंतरावर, जे पृथ्वी आणि सूर्य यांच्यातील अंतराच्या बरोबरीचे आहे, या प्रकाशाची ऊर्जा सामग्री सुमारे १३६८ W/m2 च्या वेगाने फिरते. ग्रहाचे वातावरण ही उर्जा कमी करते, एका सूर्यप्रकाशित दुपारी सुमारे १००० W/m 2 वाहू देते. ५०% सूर्यप्रकाश अवरक्त आहे, ४०% दृश्यमान स्पेक्ट्रम आहे आणि १०% अतिनील आहे.

**(साभार : इन्फोमराठी०७)**

## बदलते तंत्रज्ञान

### फक्त ३० मिनिटांत चार्ज होणारा लॅपटॉप लॉन्च

तुमच्याकडे लॅपटॉप नसेल किंवा तुम्ही जुन्या लॅपटॉपला कंटाळून नवीन लॅपटॉप घेण्याचा विचार करत असाल, तर Acer ने ग्राहकांसाठी नवीन स्विफ्ट गो लॅपटॉप लॉन्च केला आहे. या लेटेस्ट लॅपटॉपमध्ये तुम्हाला आधुनिक फीचर्ससह तगडी बॅटरी लाईफ मिळणार आहे. तसेच, या लॅपटॉपला तुम्ही अतिशय कमी वेळेत चार्ज करू शकता.



**Acer Swift Go चे फीचर्स**

या लॅपटॉपमध्ये तुम्हाला १४-इंच OLED डिस्प्ले मिळतो, ज्यात डीप ब्लॅक आणि अचूक रंग मिळतात. याशिवाय डोळ्यांच्या सुरक्षेसाठी कंपनीने या लॅपटॉपमध्ये TUV Rheinland डिस्प्ले देखील दिला आहे. Acer ब्रँडच्या या लॅपटॉपमध्ये १३ जनरेशन इंटेल कोअर एच सीरीज प्रोसेसर आणि १६ GB LPDDR5 रॅमसह SSD स्टोरेज दिला आहे.

कंपनीने हा लॅपटॉप स्लिम आणि पोर्टेबल डिझाइनसह लॉन्च केला आहे. याची जाडी १४.९ मिमी आणि वजन १.२५ किलो आहे. चार्जिंगबद्दल बोलायचे झाल्यास, स्विफ्ट गो लॅपटॉप फक्त ३० मिनिटांच्या फस्ट चार्जरने चार्ज होतो आणि ४ तासांची बॅटरी लाइफ देतो. कनेक्टिव्हिटीसाठी, तुम्हाला या Acer लॅपटॉपमध्ये २ USB Type C पोर्ट, microSD स्लॉट, HDMI २.१ आणि Wi-Fi ६ सारखे फीचर्स मिळतात.

हा लॅपटॉप 1440p QHD कॅमेरासह लॉन्च करण्यात आला आहे, ज्यात Acer च्या टेम्पोरल नॉइज रिडक्शन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. लॅपटॉपमध्ये ड्युअल फॅन सिस्टम, ड्युअल G6 कॉपर हीट पाईप्स आणि एअर इनलेट कीबोर्ड आहे, जे लॅपटॉपला थंड ठेवण्यास आणि लॅपटॉपची कार्यक्षमता वाढविण्यात मदत करतात.

**Acer Swift Go ची भारतात किंमत**

लॅपटॉपमध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसाठी ऑटोमॅटिक फ्रेमिंग आणि बॅकग्राउंड ब्लर सारखे पर्याय देण्यात आले आहेत. या नवीनतम Acer लॅपटॉपची किंमत ७९ हजार ९९० रुपयांपासून सुरू होते आणि तुम्ही हा डिवाइस कंपनीच्या एक्सक्लुसिव्ह स्टोअर, क्रोमा, एसर ई स्टोअर, ॲमेझॉन आणि विजय सेल्समधून खरेदी करू शकता.

# चित्रपटमहर्षी भालजी पेंढारकर

साठ वर्षांहून अधिक काळ चित्रपटसृष्टीमध्ये कार्यरत राहून स्वतःचे एक विशिष्ट स्थान निर्माण करणारे अवलिया म्हणजे भालजी पेंढारकर. अभिनेता, कथाकार, पटकथाकार, संवादलेखक, गीतलेखक, निर्माता, दिग्दर्शक आणि स्टुडिओ मालक अशा विविध प्रकारे त्यांनी चित्रपटसृष्टीसाठी योगदान दिले.



**निमित्त**

भालजी ऊर्फ भालचंद्र गोपाळ पेंढारकर यांचा जन्म कोल्हापूर येथे ३ मे १८९८ रोजी झाला. वडील गोपाळराव कोल्हापूर येथे नामांकित डॉक्टर होते. अभ्यासापेक्षा मौजमजा करण्यातच भालचंद्रांचे बालपण जास्त गेल्यामुळे त्यांनी जेमतेम सहावीपर्यंतच शिक्षण घेतले आणि शाळा सोडली. शाळा सोडण्याच्या कारणावरून त्यांना घरही सोडावे लागले. ते थेट पुण्याला आले आणि लो. टिळकांच्या 'केसरी' या वृत्तपत्रात नोकरी करू लागले. काही काळ तिथे नोकरी केल्यावर ते १९२० मध्ये परत कोल्हापूरला आले व 'मराठा लाईफ इन्फंट्री'मध्ये कामाला राहिले.

तेथील नोकरी सुटल्यावर भालजी पेंढारकर पुणे येथील एका थिएटरमध्ये मूकपटांची स्फुटे लिहिण्याचे काम करू लागले. लेखनकलेचा अशा प्रकारे श्रीगणेशा झाल्यावर त्यांनी 'असुरी लालसा' हे नाटक लिहिले. पुढे 'क्रांतिकारक' व 'भवितव्यता', 'संगीत कायदेभंग', 'राष्ट्रसंसार' आणि 'अजिंक्यतारा' अशी एकूण सहा नाटके त्यांनी लिहिली.

भालजी पेंढारकर यांनी चित्रपटसृष्टीस अनेक नामवंत कलाकार व तंत्रज्ञ दिले. शाहू मोडक, शांता आपटे, शांता हुबळीकर, दादा कोंडके यांनी सर्वप्रथम पडदा पाहिला तो भालजींमुळेच. १९६० साली महाराष्ट्र सरकारने मराठी चित्रपटासाठी पुरस्कार सुरू केले, पण त्या वेळीही भालजींनी आपले चित्रपट पुरस्कारार्थ पाठवण्यास नकार दिला. अखेरीस 'साधी माणसं' हा चित्रपट त्यांच्या आप्तस्वकीयांनी व स्नेह्यांनी पुरस्कारासाठी पाठवण्याची त्यांना भीड घातली. त्यांनीही सार्यांची विनंती मानली व त्या चित्रपटास महाराष्ट्र शासनाची नऊ पारितोषिके प्राप्त झाली. त्यामध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट संवाद या विभागांमध्ये भालजींना पारितोषिके मिळालेली होती. त्यानंतर सर्वोत्कृष्ट कथा आणि सर्वोत्कृष्ट चित्रपट या विभागात 'तांबडी माती' या चित्रपटाला राष्ट्रपती पारितोषिके मिळालेली होती. याखेरीज १९९१ साली 'चित्रभूषण' व 'जीवनगौरव पुरस्कार'ही त्यांना प्राप्त झालेले होते. १९९४ साली त्यांच्याच तालमीत तयार झालेल्या ग.दि. माडगूळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिल्या जाणार्या 'ग.दि.मा.' पुरस्कारानेही त्यांना गौरवले होते. १९९२ साली त्यांना चित्रपटसृष्टीचा सर्वोच्च 'दादासाहेब फाळके पारितोषिक' तत्कालीन माहिती व नभोवाणी मंत्री अजीत पांजा यांनी कोल्हापूर येथे जाऊन दिले होते.

वयाच्या ९७व्या वर्षी कोल्हापूर येथे भालजी पेंढारकर यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूपूर्वी एक वर्ष त्यांचे 'साधा माणूस' नावाने आत्मवृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यांना दादासाहेब फाळके पारितोषिक प्रदान करण्याचा समारंभ होता, त्या वेळी 'भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्रां'साठी भारत सरकारने पाच लाख रुपयांची देणगी दिली.

**(मजकूर लेखन सौजन्य : विवेक मासिक, आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, शिल्पकार चरित्रकोश)**
**मंदार जोशी**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : बदलत्या हवामानामुळे कधी कडक ऊन, तर कधी पावसाचा शिडकाव होत आहे. या दोन्ही वेळी छत्रीचा वापर करणे फायदेशीर ठरते. सध्याच्या वातावरणाची झलक दर्शविणारे तन्वी पवार यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

### मधुमेहाच्या रुग्णांनी 'ही' चार फळे अवश्य खावीत!



मधुमेहाचा आजार अतिशय वेगाने पसरत आहे. अशा वेळी मधुमेहाच्या रुग्णांनी आपल्या आहाराची विशेष काळजी घ्यावी, अन्यथा त्यांची रक्तातील साखरेची पातळी कधीकधी नियंत्रणाबाहेर जाऊ शकते. अशा वेळी रुग्णांनी फळांचा आहारात समावेश करावा, पण साखरेचे रुग्ण प्रत्येक फळ खाऊ शकत नाहीत. अशा वेळी तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही कारण आम्ही इथे तुम्हाला सांगणार आहोत की अशा कोणत्या फळांचा समावेश शुगर पेशंटने आपल्या आहारात करावा?

**मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहेत ही फळे**

किवीमध्ये अँटीऑक्सिडेंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म तसेच व्हिटॅमिन-सी, कॅल्शियम आणि पोटॅशियम सारखे पोषक असतात. मधुमेहाच्या रुग्णांनी किवीचा रस आणि सलाड अवश्य खावे, जेणेकरून त्यांचे आरोग्य चांगले राहील.

उन्हाळ्यात जांभूळ खाणे फायदेशीर ठरू शकते. या फळाची टेस्ट आपल्या सर्वांना आकर्षित करते आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे महत्वाचे आहे कारण यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते. त्याच्या बियांची पावडर बनवून खाल्ल्यानेही फायदा होईल.

संत्री व्हिटॅमिन सीचा समृद्ध स्त्रोत आहे हे आपल्या सर्वांना माहित आहे. त्यामुळे रोग प्रतिकारशक्ती वाढते. यामुळे मधुमेहाच्या रुग्णांचे आरोग्य राखण्यास मदत होते.

मधुमेहाच्या रुग्णांसाठी पेरू अधिक चांगला मानला जातो कारण या फळामध्ये व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन ए चे गुणधर्म आढळतात. याशिवाय फायबरच्या गुणधर्मांचा फायदा घेता येतो. किवीमध्ये ग्लुकोज इंडेक्स कमी असल्याने साखर नियंत्रणात राहते.

**(डिस्क्लेमर : येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. आम्ही याला दुजोरा देत नाही.)**

# विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही

## ■ माणगावच्या भूमिपूजन समारंभात आमदार भरत गोगावलेंची ग्वाही

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावकरांनी नगरपंचायत निवडणुकीत बलाढ्य शक्तीला नाकारून आम्हाला भरभरून आशीर्वाद दिला. त्यांनी केलेल्या सहकार्याची परतफेड म्हणून माणगावकरांना विकासनिधी मोठ्या प्रमाणात देत आहे. यापुढेही माणगावकरांचा विकास करण्यासाठी आपण निधी देऊ व विकसनशील माणगाव घडवू, असे आश्वासन आमदार भरत गोगावले यांनी दिले.



त्याचप्रमाणे नव्याने बांधावयाची नगरपंचायत इमारत, भविष्यातील पाणीपुरवठा लक्षात घेऊन पुढील २५ वर्षांचा आराखडा व त्यानुसार पाणीयोजना कार्यान्वित करणे तसेच गटाराचे पाणी काळ नदीत न सोडता त्याची स्वतंत्र विल्हेवाट लावण्याची व्यवस्था असे स्वप्न आहे. ही सर्व स्वप्ने मार्गी लावण्यासाठी निधीची कमरता कमी पडू देणार नाही, अशी ग्वाहीदेखील आमदार भरत गोगावले यांनी दिली.

नगरपंचायत हद्दीतील विविध विकासकामांचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा रविवारी (दि. ३०) आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते अशोकदादा साबळे लॉ कॉलेजमध्ये झाला. या वेळी दक्षिण रायगड शिवसेना संपर्कप्रमुख अरुण चाळके, दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, माशिप्र मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, माणगाव नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, दक्षिण रायगड युवासेना प्रमुख विपुल उभारे, दक्षिण रायगड शिवसेना महिला संघटिका नीलिमा घोसाळकर, माणगाव तालुका प्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, श्रीवर्धन मतदारसंघ शिवसेना संघटक सुशील दसवते, शिवसेना उपजिल्हा संघटिका दक्षिण रायगड शर्मिला सुर्वे, पाणीपुरवठा सभापती कपिल गायकवाड, स्वच्छता सभापती दिनेश रातवडकर, शहर प्रमुख सुनील पवार, माणगाव तालुका सचिव विरेश येरुणकर आदी मान्यवर या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अ‍ॅड. राजीव साबळे यांनी प्रास्ताविक केले, तर नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी विकासकामांसाठी आपण पाठपुरावा करून जास्तीत जास्त निधी द्यावा, अशी मागणी केली.

# खोपोलीत पाणीटंचाईची झळ तीव्र

## पाणीगळतीकडे मात्र पालिकेचे दुर्लक्ष

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील काही भागात मुबलक पाणीपुरवठा केला जात असला, तरी उंचावरील व दूरवरच्या अनेक रहिवासी भागात मात्र अपूर्ण पाणीपुरवठा होत असल्याने दिवसेंदिवस पाणीटंचाई वाढत आहे. दरम्यान विविध ठिकाणी होणारी पाणीगळती रोखण्याचा प्रयत्न झाल्यास पुरेसा पाणीपुरवठा होईल, मात्र पालिका पाणीपुरवठा विभाग याकडे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे.

शहरातील विणानगर, आशियाना इस्टेट, ड्रीमलँड, काटरंग, मोगलवाडी, शीळफाटा, यशवंत नगर, लौजी व अन्य काही रहिवासी भागांत मार्च महिन्यापासून पाणीटंचाई सुरू आहे. एप्रिल महिन्यात बोअरिंग आटल्याने ही पाणीटंचाई अधिक वाढली आहे. त्यात पालिकेकडून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक



हैराण आहेत. एका बाजूला पाणीटंचाई व दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर पाणीगळतीने पाणी वाया जात असल्याने नागरिकांतून पालिकेच्या कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

**दोन वर्षांपूर्वी पालिकेने केलेल्या पाणी ऑडिट अहवालानुसार, खोपोली पाणीपुरवठा यंत्रणेतून एकंदरीत ३५ टक्के शुद्ध केलेले पाणी गळती होऊन वाया जात आहे. ही गळती १० टक्केपेक्षा कमी आणता येऊ शकते असे सुचविण्यात आले आहे. याकडेही पालिकेचे दुर्लक्ष होत आहे.**

**“ गळती रोखण्यासाठी विशेष पथक कार्यान्वित आहे. नागरिकांनी सूचना किंवा लक्षात आणून दिल्यास अधिक परिणामकारक सुधारणा होतील.**

**–विनय शिपाई, वरिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा विभाग**

# कर्जत–मुंबई लोकल वेळेवर सोडण्याची मागणी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथून सकाळी ७ वाजून ५२ मिनिटांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे सुटणारी लोकल नेहमीच काही न काही कारणांमुळे उशिरा ने धावत असल्याने प्रवाशांची गैरसोय होते. त्यामुळे ही लोकल गाडी वेळेवर सोडण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

७.५२ वा. ची कर्जत–सीएसएमटी लोकल खोपोलीहून येणारी ७. ४५वा. च्या खोपोली–कर्जतला कनेक्टेड असल्याने दोन्ही लोकल म्हणजेच एकमेकांवर अवलंबून असते. त्यामुळे यापैकी एक जरी लोकल उशीरा धावत असेल तर लोकल गाड्या उशिराने सोडण्यात येतात. यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांचा खोळंबा होतो. रेल्वे प्रशासनाने कर्जत–मुंबई लोकल वेळेवर सोडाव्यात जेणे करून प्रवाशांना विशेषतः नोकरदारांना आर्थिक भुर्दंड बसणार नाही. यासाठी आपण पाठपुरावा करीत आहोत, असे पंकज ओसवाल यांनी सांगितले.

# रोह्यात श्री गणपती मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

रोहे अष्टमी नामदेव शिंपी समाजाच्या रोह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या प्रसिद्ध पुरातन असलेल्या श्री गणपती मंदिराचा १२७वा वर्धापनदिन समाजाचे अध्यक्ष मकरंद बारटक्के व महिला अध्यक्षा संपदा पतंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.



यानिमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सकाळी पाच यजमान जोडप्यांनी यामध्ये मकरंद बारटक्के व अनुराधा बारटक्के यांनी श्री सत्यनारायणाची व श्री नामदेव महाराज यांची, संतोष व संपदा पतंगे यांनी श्री गणेशाची, मनीष व विदुला करंबे यांनी श्री शंकर महादेवाची, अजय व अशा नाझरे व प्रमोद व पुनम पाटुकले यांनी श्री हनुमान मारुतीची विधिवत पूजा व अभिषेक केले. रंगीबेरंगी फुलांच्या माळा, उत्तम रांगोळ्या व विद्युत रोषणाईने मंदिर सुशोभित करण्यात आले होते. सायंकाळी श्री हेमंत ओक आणि सहकारी यांचा अभंग सेवा मंडळाचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम घेण्यात आले. या वेळी उदय ओक, प्रकाश कुंटे, आदित्य ओक, दीपक बापट बंधू व विनायक ठाकूर यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्याध्यक्ष प्रेषित बारटक्के, किरण बारटक्के, धवल कजबजे, अजित पतंगे, प्रमोद कजबजे, महिला पदाधिकारी व समाज बांधवांनी प्रयत्न केले. संपूर्ण पूजेचे पौरोहित्य रवींद्र पतंगे यांनी केले.


## जागा विकत घेणे आहे

**पनवेल परिसरात खुली (मोकळी) जागा विकत घेणे आहे.**

**(एन.ए. असल्यास प्राधान्य देण्यात येईल. जागा शक्यतो रोडला लागून असावी.)**

**संपर्क क्र.:**

**९०११६८४२६५/९३५६२७८४३७**



अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड. स्वप्निल व्यं. जाधव

**मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर पनवेल यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज क्र. ५९८/२०२३
नेता – १२/०७/२०२३

श्रीमती पुष्पा अनिल खुमान व इतर ........ अर्जदार

**जाहिर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी कै. अनिल हादा खुमान यांचे दिनांक १३/०९/२००७ रोजी मुंबई येथे निधन झाले.
कै. अनिल हादा खुमान यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

मौजे कामोठे, ता. पनवेल जि.रायगड येथील सदनीका मिळकत स्वर गंगा को. ऑप. हौ. सोसायटी ली., सदनिका क्र. ए–२०६, दुसरा मजला, प्लॉट नं. ६२, सेक्टर १८, क्षेत्र २७.१२ चौ.मी. कारपेट म्हणजेच ३२.५५ चौ. मी बिल्टअप.

मयत कै. अनिल हादा खुमान यांच्या पष्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. अनिल हादा खुमान यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.
सदरची नोटीस आज दिनांक ०२/०५/२३ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क. लिपिक
दिवाणी न्यायालय (व स्तर)
पनवेल, जिल्हा रायगड


कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व स्तर)
पनवेल, जिल्हा रायगड


# कर्जतमध्ये महाराष्ट्र स्थापना दिन साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६३वा वर्धापन दिन कर्जतमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, नायब तहसीलदार रवींद्र राऊत, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, सोपान बाचकर आदी उपस्थित होते. नगर परिषद कार्यालयात नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी नगरसेवक बळवंत घुमरे, सोमनाथ पालकर, नगरसेविका पुष्पा दगडे, प्राची डेरवणकर, सुवर्णा निलधे, मधुरा चंदन, डॉ. ज्योती मेंगाळ, वैशाली मोरे, माजी नगराध्यक्ष रजनी गायकवाड, माजी नगरसेवक नितीन परमार, दिलीप गडकरी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

माथेरान नगर परिषदेत मुख्याधिकारी वैभव गारवे, नेरळमध्ये सरपंच उषा पारधी, इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये मुख्याध्यापिका अश्विनी साळोखे, विद्याविकास मंदिर विद्यालयात मीना प्रभावळकर, अभिनव ज्ञानमंदिर प्रशालेत मुख्याध्यापक सच्चिदानंद जोशी, शारदा मंदिर विद्यालयात शालेय समिती सदस्य गजानन गडकरी, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयात प्राचार्य रवींद्र कटके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

# रोह्यातील व्यक्ती बेपत्ता

**धाटाव : प्रतिनिधी**

तिसे गावातील अनिल शिगवण हे २८ एप्रिलपासून बेपत्ता झाले आहेत. उमेश शिगवण यांनी



कोलाड पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. अनिल शिगवण (वय ४०), उंची अंदाजे १५५ सेमी, अंगात आकाशी टी–शर्ट, आर्मी कलरची हाफ पॅन्ट, उजव्या हाताचे मनगटावर इंग्रजीमध्ये एस असे गोंदलेले आहे. ही व्यक्ती कोणाला दिसल्यास कोलाड पोलीस स्थानकात दूरध्वनी (क्र. ८९९९८५०७७६) वर संपर्क साधावा.

# जनतेसाठी आपला दवाखाना खूप आवश्यक –पंकज भुसे

**मुरूड : प्रतिनिधी**

पुढील काळात जनतेच्या सेवेसाठी आपला दवाखाना सज्ज असेल लोकांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी दवाखाना खूप आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुरूड–जंजिरा नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केले.



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाचा शुभारंभ नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी फित कापून करण्यात आले. या वेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी लहाने, आरोग्यवर्धिनी केंद्रचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत डोंगरे, राजेंद्र चुनेकर, मनोज पुलेकर, नवापाडा कोळी समाजचे अध्यक्ष सवाई, गजानन तरे, गणेश शिंदे, प्राची कारभारी, मयूर पाटील उपस्थित होते.

# दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**म्हसळा : प्रतिनिधी**

गोंडघर गावातील सुशांत काशिनाथ नाईक (वय २१) याचा पुणे–दिघी या राष्ट्रीय मार्गानजीक दुचाकी अपघातात मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. १) रात्री ८.४५ वा. झाला.



सुशांत सोमवारी रात्री गोंडघर येथे आपल्या घरी जात असताना पुणे–दिघी या राष्ट्रीय मार्गानजीक खोदाई करून काढलेल्या मातीचा ढिगारा रात्रीच्या अंधारात न दिसल्याने त्याची दुचाकी या मातीच्या ढिगाऱ्यावर जाऊन जोरदार आदळली. त्यामुळे सुशांतच्या डोक्याला गंभीर इजा होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती राज संजय श्रीवर्धनकर (रा. बोर्लीपंचतन) यांनी दिघी सागरी पोलीस स्टेशनला दिली. मृत सुशांतचे पश्चात आई–वडील आहेत.

# किरण बाथम यांना पत्रकारिता पुरस्कार

**रोहे** : १९८७पासून वृत्तपत्र आणि टीव्ही मीडियामध्ये पत्रकारिता करणाऱ्या किरण बाथम यांना ऑल जर्नालिस्ट फ्रेंड सर्कल राष्ट्रीय संघटनेचा कै. मधुकर लोंढे पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. मुंबईत बुधवारी (दि. ३) आयोजित समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार एजेएफसीचे संस्थापक अध्यक्ष यासिन पटेल यांनी दिली.



किरण बाथम यांनी वेगवेगळ्या दैनिकांच्या माध्यमातून पत्रकारिता केली. मराठीमधील प्रतिष्ठीत चित्रलेखा साप्ताहिकचे ते कोकण प्रतिनिधी होते. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचा निर्भीड पत्रकार पुरस्कार, राज्यस्तरावरील अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# युवकांच्या सक्षमीकरणासाठी व्होकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

स्थानिक युवकांच्या कौशल्यांमध्ये सुधारणा करून त्यांच्यासाठी रोजगार संधींमध्ये वाढ करून त्यांना सक्षम बनविण्याच्या उद्दिष्टाने टाटा स्टीलने आपल्या खोपोली प्लांटच्या जवळ जे. एन. टाटा व्होकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे उद्घाटन केले.

उदघाटन समारंभासाठी कर्जत–खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे, विश्वनिकेतन ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. एस. एस. इनामदार, टाटा स्टील मेरामंडली ऑपरेशन्स विभागाचे उपाध्यक्ष आणि न्यू मटेरियल बिजनेस व ग्राफिनचे सुबोध पांडे आणि टाटा स्टील खोपोली व होसूरचे एक्झिक्युटिव्ह प्लांट हेड कपिल मोदी आणि एलअँडडीच्या चीफ, चीफ डायव्हर्सिटी ऑफिसर व जेएनटीव्हीटीआयच्या सेटलर जया सिंग पंडा उपस्थित होते.

या वेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले की, त्यांनी जेएनटीव्हीटीआय ट्रेनिंग सेंटर आणि त्यांच्या अभ्यासक्रमांबद्दल अधिक माहिती जाणून घ्यावी. विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रात करियर घडवता येईल, यासाठी सुसज्ज करावे यासाठी त्यांनी सेंटरला प्रोत्साहित केले. या संस्थेला आपला नेहमी पाठिंबा राहील असे आश्वासन त्यांनी दिले.

जे. एन. टाटा व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर हे खोपोली येथील विश्वनिकेतन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एंट्रप्रिन्युअरशिप अँड इंजिनीयरिंग टेक्नॉलॉजीच्या परिसरात असून, वर्गात अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. स्टेलर ६० ही पहिली बॅच असून यामध्ये मेकॅनिकल सुपरवायजर, वेल्डर कम गॅस कटर, इलेक्ट्रिशियन आणि साईट सेफ्टी सुपरवायजर अशा विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश देण्यात आले आहेत.

प्रवेशासाठी मूल्यांकन करण्यात आलेल्या ३७५ विद्यार्थ्यांपैकी ६३ जणांना पहिल्या बॅचमध्ये प्रवेश मिळाला आहे.





महानिर्मिती

## ई-निविदा सूचना

**१) निविदा.क्रं ३००००३७९४९ (R) आय अँड सी-यू-८ विषय:** वर्क ऑफ ओवरहौलिंग ऑफ एचपी बायपास सिस्टम कंट्रोल वाल्वज अॅट यू-८ आय अँड सी, २५० मे. वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु. ०.७५ लाख, बयाना : रु.२२५०/- **२) निविदा. क्रं ३००००३७९७० (R) सीएचपी-यू-६,७ विषय:** वर्क ऑफ प्रोव्हाडिंग सफीशियंट मॅनपॉवर फॉर चोकअप रिमोवल अॅट व्हेरियस ट्रान्सफर पॉइंट इन रेनी सीजन अॅट सीएचपी यू-६,७ २५० मे. वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.२४.७६ लाख, बयाना : रु.२८२६९/-**३) निविदा.क्रं ३००००३७९८२ (R) बीएम-यू-८विषय:** टू इयर एएमसी फॉर वर्क ऑफ अरेस्टिंग कोल लिकेज थ्रू कोल पाइप बाय अप्लाईंग सोडियम सिलकेट इन यू-८ अॅट बीएम,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.१४.०४ लाख, बयाना:रु.१७५४९/-निविदा क्रमांक ०१ ते ०३ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा/निविदा भरण्याचा अंतिम दिनांक: ०३.०५.२०२३ पासून ११.०० वाजता ते दिनांक १७.०५.२०२३ ते १६.०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक १८.०५.२०२३ पर्यंत १२.०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. **४) निविदा.क्रं ३००००३७८५७ बीएम-यू-६,७विषय:** टू इयर मेंटेनेंस कॉंट्रॅक्ट फॉर द वर्क ऑफ कोल फ्लो ईस्टब्लिश्मेंट फ्रॉम बंकर टु कोल फीडर अँड प्रोव्हाडिंग ऑफ असिस्टंट फॉर ऑपरेशन अॅक्टीविटीज अॅट बीएम यू-६,७, २५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.८६.५९ लाख, बयाना :रु.९००९१/- **५) निविदा.क्रं ३००००३७८६१ टीएम-यू-८विषय:** वर्क ऑफ मेंटेनेंस ऑफ हॉट वॉटर डिस्ट्रिब्यूशन एरिया ऑफ एनडीसीटी अँड सीडब्ल्यू पम्प हाऊस ऑक्झीलरिझ सर्विसिंग अॅट टीएम यू-८,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.९.०१ लाख, बयाना :रु.१२५१४- **६) निविदा.क्रं ३००००३७९३५ बीएम-यू-६,७ विषय:** सप्लाय ऑफ एसएस फ्लेक्सिबल होज, एसएस कोर्रुगेटेड सप्लाय होज अँड बुश फॉर ऑइल गन अॅट यू-६,७,२५० मे.वॅट, बीएम, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.३.८५ लाख, बयाना :रु.७३५३- **७) निविदा.क्रं ३००००३७९५३ एएचपी-यू-६,७विषय:** प्रॉक्यूरमेंट ऑफ नॅशसीएल-२००१ ऑर ईक्वीव्हेलेण्ट वैक्युम पम्प कंप्लीट असेम्ब्ली अँड इट्स स्पेयर्स अॅट यू-७ एएचपी,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.४७.८४ लाख, बयाना :रु.५१३४४/- **८) निविदा.क्रं ३००००३७९५६ आय अँड सी-यू-८विषय:** प्रॉक्यूरमेंट ऑफ स्मार्ट पोजिशन फीडबॅक ट्रान्समिटर फॉर कंट्रोल वाल्व अँड डॅम्पर्स अॅट यू-८ आय अँड सी,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.२.६० लाख, बयाना : रु.६१०६/- **९) निविदा.क्रं ३००००३७९५७ आय अँड सी-यू-८विषय:** प्रॉक्यूरमेंट ऑफ अल्ट्रासोनिक लेवल ट्रान्समिटर ऑफ लेवल मॉनिटरिंगऑफ व्हेरियस सिस्टम अॅट यू-८ आय अँड सी ,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.२.६४ लाख, बयाना :रु.६१४०/- **१०) निविदा.क्रं ३००००३७९६४ सीएचपी-यू-८विषय:** वर्क ऑफ प्रोव्हाडिंग सफीशियंट मॅनपॉवर फॉर चोकअप रिमोवल अॅट व्हेरियस ट्रान्सफर पॉइंट इन रेनी सीजन अॅट सीएचपी यू-८,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.३४.९४ लाख, बयाना : रु.३८४४८/- **११) निविदा.क्रं ३००००३७९७३. आय अँड सी-यू-८विषय:** अॅन्युअल वर्क कॉंट्रॅक्ट फॉर रिमोट सपोर्ट रिलेटेड टू कनेक्टीविटी ऑफ सीईएमएस अॅन्यालायझर टु सीपीसीबी / एमपीसीबी सर्वर अॅट यू-८ आय अँड सी, २५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.१.२० लाख, बयाना : रु.३६००/- **१२) निविदा.क्रं ३००००३७९९३ एएचपी-यू-६,७ विषय:** वर्क ऑफ सर्विस ऑफ एक्सपोर्ट अँड डिसपोजल ऑफ द एक्सीटिंग न्यूक्लेओनिक सोर्स यूज्ड फॉर न्यूक्लेओनिक डेन्सिटि मिटर फॉर एएचपी, २५० मे.वॅट, टीपीएस परळी वैजनाथ अंदाजीत खर्च रु.७२.५० लाख, बयाना : रु.७६०००/निविदा क्रमांक ०४ ते १२ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा/निविदा भरण्याचा अंतिम दिनांक: ०३.०५.२०२३ पासून ११.०० वाजता ते दिनांक २३.०५.२०२३ ते १६.०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक २४.०५.२०२३ पर्यंत १२.०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. सर्व निविदांसाठी: फि रु ११८० /- **संपर्क व्यक्ती:** मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in,cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या: https://eprocurement.mahagenco.in. SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम.मदत लाईन क्रमांक: - **८४११९७१५२५.**

**मुख्य अभियंता**

## निवडक

### रेल्वे कर्मचाऱ्याचा मोबाईल चोरला

**पनवेल :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल ते पनवेल लोकलने प्रवास करणारे रेल्वेचे लोको पायलटला मोबाइल चोरीचा फटका बसला आहे. अज्ञात चोरट्याने त्यांचा मोबाईल चोरून नेला आहे. पनवेलमध्ये वास्तव्यासाठी असलेले लोको पायलट अनिलकुमार कैलासप्रसाद हे गावावरून मुंबईला आले. बोरिवली ते कुर्ला प्रवास केल्यानंतर त्यांनी पनवेल लोकलच्या प्रथम वर्गाच्या डब्यातून प्रवास सुरू केला. गावावरून मुंबईत येताना प्रवासाचा थकवा आल्याने त्यांना लोकलमध्ये झोप लागली. खांदेश्वर रेल्वे स्टेशनमध्ये त्यांना जाग आली असता त्यांच्या खिशातील ४२ हजार रुपये किमतीचा मोबाइल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. या घटनेविषयी रेल्वे स्टेशनमध्ये चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन



**नवी मुंबई :** आधुनिक काळातील महान संत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीदिनानिमित्त नवी मुंबई महापालिका मुख्यालयात उपायुक्त अनंत जाधव यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आजही त्यांचे साहित्य आपल्याला मार्गदर्शक ठरत आहे, खंजिरी भजनाचा त्यांनी प्रबोधनासाठी प्रभावी वापर केला. राष्ट्रपती भवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत म्हणून संबोधले होते. अशा राष्ट्रसंताच्या प्रेरक स्मृतींना नवी मुंबई महापालिकेच्या वतीने आदरांजली अर्पण करण्यात आली.

### विलास म्हात्रे यांना पुरस्कार



**उरण :** तालुक्यातील गोवठणे येथील सुदेश म्हात्रे स्पोर्ट्स असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष विलास म्हात्रे यांना आंतरराष्ट्रीय मानव हक्क सेवा परिषद महाराष्ट्र आदर्श मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा भारतरत्न गौरव श्री पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. सुदेश म्हात्रे स्पोर्ट्स असोसिएशनच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, सांस्कृतिक, क्रीडा आणि पर्यावरण आदी क्षेत्रात विलास म्हात्रे यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. याआधी त्यांना अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले.

### एनएमआयएमएस स्कूलमध्ये दीक्षांत समारंभ



**खारघर :** येथील एसव्हीकेएमच्या एनएमआयएमएस स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट कॅम्पसमध्ये नुकताच पाचवा दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून कॉर्पोरेट एसव्हीपी आणि ग्लोबल हेड सदरलँड ग्लोबल सर्व्हिसेसचे विवेक अरोरा या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. याचबरोबर डॉ. रूचिता वर्मा, डॉ. जयंत पी. गांधी, डॉ. शरद म्हैसकर, आशिष आपटे यांच्यासह एनएमआयएमएस अन्य कर्मचारी, इतर सदस्य आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# नवी मुंबईत 'मागेल त्याला पाणी'

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या क्षेत्रातील अनधिकृत घरांना नळजोडणी देण्याचा निर्णय आयुक्त राजेश नार्वेकर यांनी घेतला आहे. महावितरणने ज्या प्रमाणे मागेल त्याला वीज देण्याचा निर्णय घेतल्याने विजेच्या चोरीला काही प्रमाणात आळा बसला आहे. त्याच धर्तीवर आता नवी मुंबई महापालिकेने पाण्याची चोरी (गळती) रोखण्यासाठी मागेल त्याला पाणी अर्थात नळजोडणी देण्याचा निर्णय घेतला आहे. ही अभय योजना प्रायोगिक तत्वावर प्रथम एक वर्षांच्या कालावधीसाठी लागू करण्यात आली आहे.



नवी मुंबई महापालिकेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झाली आहेत. तसेच अजूनही प्रतिदिन ही बांधकामे होतच आहेत. पाणी ही जीवनावश्यक गोष्ट असल्याने प्रत्येक जण कोणत्याही प्रकारे ते मिळवत असतो. भलेही ती अनधिकृत झोपडी असो वा स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी बांधलेला कोट्यवधी रुपयांचा अनधिकृत बंगाला असो, त्यांनी घराजवळून गेलेल्या महापालिकेच्या जल वहिनीतून बेकायदेशीरपणे पाणी घेतले आहे. अशी हजारो अनधिकृत बांधकामे शहरात आहेत.

या अनधिकृत जोडण्या वारंवार खंडित करण्याची मोहीम पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून घेतली जाते, मात्र कारवाई केल्यानंतर पुन्हा काही वेळेने संबंधित रहिवाशी चोरीने रातोरात तोडलेली नळ जोडणी पुन्हा जोडतात. महापालिकेच्या स्थापनेपासून हा पाठशिवणीचा खेळ शहरात चालू आहे. यामुळे महापालिकेचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. असे असले, तरी अनधिकृत बांधकामास अधिकृत नळ जोडणी देणे शक्य नाही.

परिणामी आता महापालिकेने अन्य महापालिकेच्या धर्तीवर जुन्या अनधिकृत नळ जोडण्या नियमित (अधिकृत) न करता केवळ वापरलेल्या पाण्यावर देयक आकारण्याच्या निर्णय घेतला आहे. पाणी पुरवठयामधील तुट अल्प करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार अनधिकृतपणे पाणी वापर असलेल्या नळजोडणी धारकाकडून अनधिकृत पाण्याचा वापर अधिभार अंतर्गत वापरलेल्या पाण्याचे देयक (प्रति मास) अधिक प्रशासकीय आकार (प्रति महिना ) याप्रमाणे पाणीदेयकाची आकारणी करण्यात येणार आहे. यामध्ये झोपडपट्टी, बैठीचाळ, इमारत यांना प्रति महिना १०० रुपये, उपहारगृह, बार, बेकरी, सर्व्हिस सेंटर यांना २ हजार ८३० रुपये, किरकोळ दुकाने, लॉण्ड्री, मटन मासे दुकान, चहा दुकान, फरसाण मार्ट यांना ४९० रुपये, घरगुती वापरासह दुकाने, भाजीपाला, टेलिफोन बुथ, किराणा दुकान, दवाखाना, वखार, गॅरेज, सलून यांना १९१ रुपये प्रति महिना पाणी देयक आकारण्यात येणार आहे.

> **या योजनेचा दिलेल्या मुदतीत लाभ न घेणाऱ्या संबंधित बांधकामधारकाची अनधिकृत नळ जोडणी खंडित करण्यात येणार आहे. तसेच सध्या चालू असलेल्या अनधिकृत इमारतीस नळ जोडणी देण्यात येणार नाही. अनधिकृत घराला आकारण्यात येणारे पाणीदेयक हे अनधिकृत इमारती अथवा झोपडपट्टी अथवा बैठीचाळ अथवा सदनिका या अधिकृत असल्याचा पुरावा म्हणुन ग्राहय धरता येणार नाही.**
>
> **–संजय देसाई, शहर अभियंता**

### रसायनीत गुरे चोरांचा सुळसुळाट

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा एमआयडीसी रहिवासी कॉलनीमधील एचडीएफसी बँकेच्या परिसरात एका इमारतीचे बांधकाम सुरु आहे. तेथील सुरक्षा रक्षकांनी एचडीएफसी बँकेच्या समोरील रस्त्यावर बसलेल्या गुरांना गाडीत टाकताना पाहिले. त्या व्यक्तींकडे धारदार शस्त्र होती. दुसऱ्या दिवशी या सुरक्षा रक्षकांनी ही बाब एका व्यक्तीला सांगितली.

त्या व्यक्तीने घडलेली घटना रसायनीचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांना सांगून गुरे चोरणाऱ्या टोळीचा बंदोबस्त करा, अशी विनंती केली. त्यावर खेडकर यांनी लवकरच गुरे चोरणाऱ्या टोळीचा बंदोबस्त करू, असे सांगितले. तसेच परिसरातील नागरिकांनी ज्यांच्याकडे गाई, म्हशी, बैल आहेत त्यांनी त्यांची जनावरे मोकाट सोडू नये. शक्यतो सायंकाळनंतर बांधूनच ठेवावी, असे आवाहन खेडकर यांनी केले आहे.

## तुर्भे गाव येथे रस्ते काँक्रीटीकरण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे गावातील सर्व रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाला प्रारंभ झाला आहे. या रस्ते काँक्रीटीकरणामुळे एका वर्षात तुर्भेगाव खड्डामुक्त होईल, असा विश्वास भाजप नवी मुंबई अध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत यांनी व्यक्त केला आहे. ते रस्ते काँक्रीटीकरणाच्या कामाच्या शुभारंभावेळी बोलत होते.

या दुसऱ्या टप्प्यात अनुमाने दोन कोटी रुपये खर्चून रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. सहा महिन्यात (पावसाळा वगळता) हे काम पूर्ण होणार आहे. मुंबई – पुणे महामार्गाच्या लगतचे तुर्भेगाव प्रवेशद्वार ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, संपूर्ण तलाव परिसर यांसह अन्य मार्गाचे काँक्रीटीकरण या दुसऱ्या टप्प्यात करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्याचे साडे चार कोटी रुपयांचे काम चालू असून यामध्ये तुर्भेगाव प्रवेशद्वार ते शिवनेरी इमारत – सेक्टर २१ कॉलनीकडे जाणार मार्ग ते तुर्भेनाका येथपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम चालू आहे.

लवकरच तुर्भेगावाचे रूप पालटणार आहे, असा विश्वास डॉ. घरत यांनी व्यक्त केला आहे.

## घणसोलीत आपला दवाखाना कार्यान्वित

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना चे ऑनलाईन लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत आणि इतर मान्यवरांच्या ऑनलाईन उपस्थितीत संपन्न झाला.



राज्यभरात आजपासून सुरू होत असलेल्या ३१७ आपला दवाखान्यांमध्ये नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील कौलआळी, घणसोली येथील आपल्या दवाखान्याचा समावेश आहे. या दवाखान्यामध्ये एलईडी स्क्रीनवर ऑनलाईन लोकार्पण समारंभाचे थेट प्रक्षेपण प्रदर्शित करण्यात आले होते.

या वेळी नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर, अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण व डॉ. वैशाली म्हात्रे, डॉ शिवलता सिंग तसेच कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे, प्रवीण गाडे, घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय तायडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या शुभहस्ते घणसोली येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अनौपचारिकरित्या फीत कापून सुरू करण्यात आला.

## पालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या सेवेतून विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या तीन कर्मचाऱ्यांना महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात आयोजित निरोप समारंभात त्यांना सन्मानीत करण्यात आले.

एप्रिल २०२३ या महिन्यात सेवानिवृत्त होत असलेले महापालिका कर्मचारी मुख्याध्यापिका रत्नमाला बिरारी, लिपिक–टंकलेखक काशिनाथ सोनटक्के, आया राजश्री पुरी अशा तीन सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, विधी अधिकारी अभय जाधव यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या वेळी प्रशासन विभागाचे प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात व विलास मलुष्टे आणि अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खासगी सोसायट्यांच्या पुनर्बांधणीचा प्रश्न मार्गी लागणार -अशोक गावडे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील सिडकोनिर्मित इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रश्न शिंदे–फडणवीस सरकारने गतिमान केला आहे मात्र, खासगी हाऊसिंग सोसायट्याच्या पुनर्बांधणी अनेक जाचक अटी–शर्ती असल्याने तो मार्गी लागत नव्हता. सध्याच्या गतिमान सरकारने यात लक्ष घालून तो सोडवला आहे. लवकरच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते श्री गणेश या नवी मुंबईतील पहिल्या खासगी प्रोजेक्टच्या कामाचे भूमिपूजन होणार असल्याचे सुतोवाच माजी उपमहापौर अशोक गावडे यांनी नेरुळमध्ये बोलताना केले.

नेरूळमधील श्री गणेश मित्र मंडळाच्या वतीने माजी उपमहापौर अशोक गावडे यांच्या अभिष्टचिंतन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सत्कारास उत्तर देताना गावडे पुढे म्हणाले की, नवी मुंबईतील घरांची मालकी आजही सिडकोकडे आहे. इथं राहत असलेल्या नागरिकांची घरे फ्री होल्ड करावीत यासाठी आम्ही राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत असून लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा आशावाद गावडे यांनी व्यक्त केला आहे.



अभिष्टचिंतन सोहळ्यात डॉ. डी. आय. पाटील विद्यापीठाचे अधिकारी डी. डी. कोलते, शिवसेना बेलापूर सहसंपर्क प्रमुख पाटील श्री गणेश हाऊसिंग सोसायटीचे अध्यक्ष आदी उपस्थित होते.

## नवी मुंबईतील बेवारस वाहनांबाबत पोलिसांचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सीबीडी पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्या आवारात मोटार दुचाकी बेवारस असून पोलीस ठाणे हद्दीत बेवारस पडून आहेत. या वाहनांचे मालकी हक्काबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सीबीडी पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

वाहनांची माहिती पुढील प्रमाणे, मोटार सायकल बजाज पल्सर काळ्या रंगाची, एमएच–०५/ एव्ही–७३८४, यामाहा एमएच–०३/एक्यू–८७३६, हिरोहोंडा एमएच–४६/४७१४, बजाजपटना एमएच–०४/ईई ४०, बजाज पल्सर एमएच–०३/वाय–९६५५, हिरोमेस्ट्रो एमएच–०३/बीव्ही–४७०३, होन्डा एक्टीव्हा एमएच०३/बीएल–७५१०टिव्ही एसस्टार एमएच–०४/सीक्यू–३६३३, बजाज पल्सर एमएच ०६/एपी–४३८८, हिरोहोंडा एमएच–३१/एवाय–४२२० टिव्हीएस एमएच–०४/ईव्ही–१८९६, हिरोहोंडा एमएच०३/वाय–५०६८, होन्डा एक्टीव्हा एमएच–०६/ बीके–५३६५ हिरोहोंडास्प्लेंडर एमएच–३८/ए–२८५१, होन्डाएक्टीव्हा एमएच–०४/एचएच–३८९२, टिव्हीएस एमएच–४३/बीजे ६४०५, टिव्हीएस एमएच–४३/एएम–७५०४, होंडाडिओ एमएच ४६/बीएक्स–०६८९, होंडाडिओ एमएच–४७/५–००५०, होन्डा एक्टीव्हा एमएच०१/एक्यू–८०३०, बजाजपल्सर एमएच–०२/एडब्ल्यू ८२४९, हिरोहोंडास्प्लेंडर एमएच–०३/१–९३१९, बजाज पल्सर एमएच ०२/एफए–५३०० बजाज एव्हेंजर एमएच०१/एक्यू–९६३६, बजाज पल्सर एमएच–४३/के–२३००, हिरोहोन्डा सीडी एमएच–४३/बी३२४३, स्प्लेंडर प्लस एमएच–०६/एयू–४७५८, अधिक माहितीसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सीबीडी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## विद्याभवन शिक्षण संकुलात योग शिबिर



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात सर्व कर्मचाऱ्यांसाठी पंधरा दिवसांच्या निशुल्क योग शिबिरानंतर आयोजित केलेल्या आहार आणि योग विषयक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

योग विद्या निकेतन संस्थेचे उपाध्यक्ष दुर्गादास सावंत नियमित योगाभ्यास करून तंदुरुस्त व्हावे, असे आवाहन केले. सर्व कर्मचाऱ्यांकडून तणावमुक्त मन व शरीर ठेवण्यासाठी आसने करुन घेतली, यासाठी संपदा पौवणीकर, शिवसर, नमिता दत्ता, रवींद्र खवणेकर, ऑथेटिक शर्मा, दीप वर्मा यांनी विविध आसनांचा सराव करून घेतला.

या उपक्रमात पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक दिनेश मिसाळ मुख्याध्यापक भिमराव आडसूळ, राजकुमारी इंदलकर, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

## युईएस कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा आज ६३वा वर्धापनदिन. संपूर्ण महाराष्ट्रासह यु.ई. एस.स्कूल अॅण्ड कॉलेजमध्ये 'महाराष्ट्र दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.



यासपीठावर यु.ई.एस.संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, मानद सचिव आनंद भिंगार्डे, सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सिनीयर कॉलेजच्या एचओडी तसेच पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील सुपरवायझर उपस्थित होत्या. सर्वात प्रथम संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन यांनी आपल्या राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण केले. सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन यू.ई.एस. परिवारातील शिक्षकांनी सूत्रबद्ध पध्दतीने केले.

## वीर वाजेकर महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन

**उरण : वार्ताहर**

वीर वाजेकर महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त ध्वजारोहण झाला. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने प्राचार्य, डॉ.पी. जी. पवार यांनी महाराष्ट्र स्थापने पासून ते आजपर्यंत महाराष्ट्र राज्याच्या विकासाचा आढावा घेतला.



सामाजिक,सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय बदलांचा उहापोह केला. आजच्या विद्यार्थ्यांना याविषयी माहिती असणे गरजेचे आहे. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण महाराष्ट्र जडणघडणीचा इतिहास एकूणच आलेख विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविले पाहिजे.

कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी तसेच एन.सी.सी. व एन.एस.एस.चे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन प्रा. संतोष देसाई यांनी केले. उपप्राचार्य, डॉ. विलास महाले, प्रा. उत्तमराव घोरपडे उपस्थित होते.

## चित्रपट, नाट्यगृहात महाराष्ट्र राज्यगीत लावण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई भाजप अनुसूचित जाती–जमाती सेल तथा सोशल मीडियाचे प्रमुख योगेश शिंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवत महाराष्ट्रामधील संपूर्ण चित्रपटगृहात व नाट्यगृहात महाराष्ट्र राज्यगीत लावण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने १ फेब्रुवारी २०२३ रोजी अधिकृतरित्या महाराष्ट्र राज्याचे अधिकृत राज्यगीत असावे यासाठी जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा या कविवर्य राजा नीळकंठ बढे यांच्या गीतामधील दोन चरणांचे गीत महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून स्वीकारण्यात आले आहे. हे राज्यगीत १.४१ मिनिट अवधीचे आहे. त्या अनुषंगाने योगेश शिंदे यांनी महाराष्ट्र सरकारकडे अशी मागणी केली आहे की, महाराष्ट्रातील संपूर्ण चित्रपट गृहात व नाट्यगृहात चित्रपट व नाटक सुरू होण्याअगोदर किंवा नंतर चित्रपटगृहात व नाट्यगृहात महाराष्ट्राचे राज्यगीत जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा हे राज्यगीत लावण्यात यावे, असे आदेश महाराष्ट्र सरकारने व सांस्कृतिक विभागाने महाराष्ट्रातील संपूर्ण चित्रपटगृह व नाट्यगृहचालकांना देण्यात यावे, अशी विनंती या पत्रात करण्यात आली आहे.

## सुधागड तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेला ठाण्यात प्रतिसाद

# रासळ संघ आमदार चषकाचा मानकरी





**पाली : प्रतिनिधी**

ठाण्यात वास्तव्यास असलेल्या रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुका रहिवाशांच्या कला, क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी ठाणे शहर विधानसभा आमदार संजय केळकर व भाजप ठाणे शहर (जिल्हा) अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप ठाणे शहर सचिव तथा सुधागड तालुका रहिवासी सेवा संघाचे सल्लागार, सन्मान फाउंडेशनचे अध्यक्ष रमेश सागळे यांच्या वतीने ठाणे शहर भाजप व सन्मान फाउंडेशनच्या वतीने सुधागड तालुकास्तरीय आमदार सन्मान चषक भव्य कबड्डी स्पर्धा आयोजित करण्याता आली होती. या स्पर्धेत जय हनुमान क्रीडा मंडळ (एन) रासळ संघाने विजेतेपद पटकाविले.

कॉ. गोदुताई परूळेकर मैदानात झालेल्या या स्पर्धेत सुधागड तालुक्यातील २६ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यात जय हनुमान क्रीडा मंडळ (एन) रासळ संघाने श्री वरदायिनी क्रीडा मंडळ राबगाव संघावर २०-६ असा १४ गुणांनी विजय संपादन केला. तृतीय क्रमांक रणधुरंधर स्पोर्टस् क्लब पाली, तर भैरवनाथ क्रीडा मंडळ वावे संघाने चौथा क्रमांक पटकाविला.

स्पर्धेचे उद्घाटन आमदार संजय केळकर व आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास सुधागड तालुक्यातील आंतरराष्ट्रीय चित्रकार गोल्ड मेडलिस्ट चेतन पाशिलकर, भाजप ठाणे शहर उपाध्यक्ष राजेश मढवी, सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, माजी खासदार संजीव नाईक, ठाणे शहर भाजप महिला अध्यक्ष मृणाल पेंडसे, 'पितांबरी'चे रवींद्र प्रभूदेसाई, नौपाडा वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय धुमाळ, शिवसेना प्रवक्ते नरेश म्हस्के, माजी नगरसेवक नारायण पवार, मनोहर डुंबरे, विकास पाटील, संतोष साळुंखे, धनंजय सिंग, पाली नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, रासळचे सरपंच नरेश खाडे, पालीचे नगरसेवक पराग मेहता, वाघोशी ग्रामपंचायतीचे उपसरपंच सनीश टक्के, माजी सदस्य अतिश सागळे, दीपक पवार, दर्शना मांढरे, उद्योजक धनराज सागळे, अविघ्न रिडेव्हलोपर्सचे चारूदत्त सावंत, जतिन गडा, युवान ग्रुपचे स्वप्नील मराठे, सामाजिक कार्यकर्ते गणेश दंत, आयोजक रमेश सागळे, शिवाजी दळवी, प्रकाश शिलकर, शंकर काळभोर, राकेश थोरवे, राजू पातेरे, अविकांत साळुंके, विजय जाधव, अजय जाधव आदी उपस्थित होते.



## सागवाडी संघाने कामगार चषक जिंकला

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टीलायझर्स (आरसीएफ) लि., थळतर्फे अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सहयोगाने आयोजित जिल्हास्तरीय आदिवासी कबड्डी स्पर्धेत श्री गणेश सागवाडी संघाने विजेतपद मिळवून कामगार चषक पटकावला. वाघोबा खैरवाडी संघ उपविजेता ठरला. लक्ष्मीबाई वाघजई संघाने तृतीय, तर जय बापदेव बोरावाडी संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

कामगार दिनाचे औचित्य साधून आरसीएफ क्रीडासंकुल कुरूळ येथे सोमवारी ही कामगार चषक आदिवासी कबड्डी स्पर्धा रंगली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ६४ आदिवासी संघ सहभागी झाले होते.

अंतिम सामना श्री गणेश सागवाडी आणि वाघोबा खैरवाडी या दोन संघांमध्ये अटीतटीचा झाला. यात सागवाडी संघाने खैरवाडी संघावर ३२-३० असा विजय मिळवून विजेतपद पटाकाविले. तत्पूर्वी उपांत्य फेरीच्या पाहिल्या सामन्यात सागवाडीने महालक्ष्मी वाघजई संघाचा पराभव करून अंतिम फेरी गाठली होती, तर दुसऱ्या उपांत्य लढतीत खैरवाडीने जय बापदेव संघावर मात करून अंतम फेरीत प्रवेश केला होता.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून सागवाडीचा हिरामण सोनार याला गौरविण्यात आले. खैरवाडीचा निलेश वारगुडी याला उत्कृष्ट चढाईचे, तर परेश शिद याला उत्कृष्ट पकडीचे पारिताषिक देण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास आरसीएफ थळचे अनिरुद्ध खाडिलकर, शशिकांत उखळकर, नितीन हिरडे, संजीव हरळीकर, विनायक पाटील, पंकज पाटील, अलिबाग प्रेस असोसिएशनचे जितू शिगवण, राजन वेलकर, हर्षद कशाळकर, प्रफुल्ल पवार, रमेश कांबळे, भारत रांजणकर, महेंद्र दुसार उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

## श्री स्वामी समर्थ संघ झुंझार प्रीमियर लीगचा विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील झुंझार युवक मंडळाच्या ६१व्या वर्धापन दिनानिमित्ताने आयोजित झुंझार पोयनाड प्रीमियर लीग कै. देवेंद्र पाटील स्मृतिचषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत श्री स्वामी समर्थ ओमसाई फार्महाऊस पोयनाड संघाने विजेतेपद पटकाविले. मराठा वॉरियर्स संघ उपविजेता ठरला.

झुंझारच्या सुसज्ज मैदानावर झालेल्या या स्पर्धेत गावातील मराठा वॉरियर्स, पोयनाड सुपरजायंट्स, दि बॉईज, नंदा बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स, श्री स्वामी समर्थ ओमसाई फार्म हाऊस अशा पाच संघांनी सहभाग घेतला होता. संपूर्ण स्पर्धेत अष्टपैलू खेळ करणारा विशाल निषाद हा अंतिम लढतीतील सामनावीर व मालिकावीर ठरला. मिलिंद पाटील उत्कृष्ट फलंदाज, प्रणय साळवी उत्कृष्ट गोलंदाज, तर प्रीत जैन याला उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून गौरविण्यात आले.



स्पर्धेचे उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभासाठी ग्रामपंचायत सदस्य तथा मंडळाचे सदस्य माजी खेळाडू सुनील पाटील, मंडळाचे अध्यक्ष अन्वर बुराण, किशोर तावडे, अजय टेमकर, माजी सरपंच भूषण चवरकर, सदस्य अजित चवरकर, डॉ. मोनाली चवरकर, संजय सातघरे, जितेंद्र जैन, भरत जैन, महेश अग्रवाल, विजय चवरकर, उदय चवरकर, योगेश चवरकर, मनोज भगत यांच्यासह क्रीडाप्रेमी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महा बास्केट व वरिष्ठ बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धा खारघरमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महा बास्केटबॉल संघटना संलग्न भारतीय बास्केटबॉल महासंघ व फीबाच्या मान्यतेने रायगड जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या वतीने पहिल्या महा बास्केट ३ ऑन ३ कनिष्ठ गट (१८ वर्षाखालील) व १८ वर्षावरील वरिष्ठ गट पुरुष व महिला गटांच्या रायगड जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आली आहे. खारघर सेक्टर १६ येथील केपीसी इंग्लिश हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज या ठिकाणी ही स्पर्धा ३ मे रोजी होणार आहे.

या स्पर्धेतून प्रत्येक वयोगटातून निवडले दोन संघ ५ व ६ मे रोजी सातारा येथे होणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र कोकण झोन विभाग कनिष्ठ व वरिष्ठ पुरुष व महिला गटांच्या बास्केट ३ ऑन ३ स्पर्धेसाठी निवडले जातील. या झोनमधून निवडलेले खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवडले जातील.



जास्त संघ आल्यास ४ मे रोजी ही स्पर्धा घेण्याबाबत ठरविले जाईल. खेळाडूंनी ३ मे रोजी संध्याकाळी ठीक ४.३० वाजता उपस्थित राहणे अनिवार्य आहे. १८ वर्षांखालील मुले व मुली गटासाठी १ जानेवारी २००५नंतर जन्म असलेले खेळाडू पात्र राहतील. १८ वर्षावरील सिनियर गटासाठी खेळाडूंना वयाची अट नाही.

बास्केटबॉल निवड चाचणीसाठी जिल्ह्यातील व पश्चिम महाराष्ट्र कोकण विभागातील इतर कुठल्याही जिल्ह्यातील कोणत्याही शाळा, महाविद्यालये, खासगी मंडळे, क्लब आदींचे संघ सहभागी होऊ शकतात, मात्र खेळाडूंना राज्याच्या एकाच जिल्ह्यातून एकदाच खेळण्याची संधी प्राप्त होणार आहे.

इच्छुक मुला, मुलींनी सहभागी होऊन स्पर्धा यशस्वी करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव संदीप गुरव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संदीप गुरव (९९६०७०२५१०), अमित थिटे (७५०६७९९९६७), इम्तियाज (८६५२७०९००४), अक्षय राणा (८९२८३९८६१९)यांच्याशी संपर्क साधावा.

## रायगड जिल्ह्याचा ज्युनियर मुलींचा क्रिकेट संघ जाहीर



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने जिल्ह्याचा ज्युनियर (१९ वर्षाखालील) मुलींचा संघ जाहीर केला आहे. या संघात २० खेळाडूंचा समावेश आहे, अशी माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.


रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने जिल्ह्याचा ज्युनियर मुलींची संघ निवडण्यासाठी २१ एप्रिल रोजी भेंडखळ क्रिकेट अकॅडमी, उरण येथे निवड चाचणी आयोजित केली होती. त्यातून २० मुलींची संघात निवड करण्यात आली.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे १९ वर्षांखालील मुलींची आमंत्रितांची स्पर्धा ४ मेपासून आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत रायगडचा संघ सहभागी होईल, अशी माहिती चंद्रकांत मते यांनी दिली.


**संघ** : सेजल जगताप, वंशिका राणावत, काजल साळुंखे, समृद्धी कांबळे, रोशनी पारधी, अमिषा बामणे, अंजली गोडसे, सुचिता नाचणकर, खुशी भारती, समिधा तांडेल, जान्हवी चौगुले, ईश्वरी खेत्री, ऋतिका पाटील, निशिता विटलानी, वैभवी कुलकर्णी, साची बेलोसे, एकता शर्मा, साई शिंदे, सिद्धी पाटील, वैष्णवी गीते; प्रशिक्षक व व्यवस्थापक मनीषा अडबळ.


वर्ष १० वे ॥ॐ श्री बाळकृष्णाय नमः ॥ स्थापना २०१४

**दहावा पुण्यस्मरण सोहळा**



(नंदेश्वर)




(नंदेश्वर)



पिताजी
श्री. चांगू काना ठाकूर



मातोश्री
श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



(मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमच्या माताजी स्वानंद सुख निवासी 'श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर' यांची दहावी पुण्यतिथी मिती वैशाख शु. १२ शके १९४५ मंगळवार दि. ०२/०५/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. श्री. स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरु चरित्रामृत ग्रंथाचे श्री दासबोध पारायण पर्वणी प्रारंभ, मिती वैशाख शु. १३, बुधवार दि. ०३/०५/२०१३ रोजी दुपारी १२.०० वा. पुण्यतिथी निमित्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरुबंधु भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

: कार्यक्रम :

बुधवार दि. ०३/५/२०२३

| | |
|---|---|
| सकाळी ९.०० ते १०.०० संगित भजन : | बुवा : श्री.निवृत्ती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, सुरेश ठाकूर (शिवाजीनगर), नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा), पखवाज : गौरव म्हात्रे |
| सकाळी १० ते १२ प्रवचन : | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| दुपारी १२ वाजता : पुष्पवृष्टी : | श्री समर्थ स.स. बाळकृष्ण महाराज माऊलींवर पुष्पवृष्टी, शिवाजीनगर |

कार्यक्रमाचे ठिकाण : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल.

व्यवस्थापक : देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) शिवाजीनगर - गव्हाण - कोपर - न्हावे - न्हावेखाडी (संचलित)

संयोजक : श्री. रामशेठ ठाकूर माजी खासदार आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर



वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...



भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष



**रोहित जगताप**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

भाजपा



वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...



भाजप युवा कार्यकर्ते



**चेतन ढुकरे**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

भाजपा

सौजन्य : जगदिश वाघमारे, किशोर सुरते


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com